# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०–२५६०१२६४
२५६०१२६५
ई–मेल: pldvp@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
नियोजन व विकास विभाग


संदर्भ – साफुपुवि/निववि/ 446

दिनांक : १६/०६/२०१६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक
संलग्न महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था व
आदिवासी विभागातील महाविद्यालये/संस्था.

**विषय : बिगर आदिवासी विभागातील महाविद्यालये/संस्था गुणवत्ता सुधार योजना व आदिवासी विभागातील महाविद्यालये/संस्था गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१६–१७ साठी फक्त कार्यशाळा/परिषदा आयोजनाकरिता ऑनलाईन पध्द्तीने प्रस्ताव सादर करणेबाबत.**

महोदय/महोदया,

महाविद्यालय गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत बिगर आदिवासी विभागातील संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थांकडून तसेच आदिवासी विभागातील महाविद्यालये/संस्थांकडून शैक्षणिक वर्ष २०१६–१७ साठी कार्यशाळा/परिषदा यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याचा कालावधी **गुरुवार, दिनांक १६ जून, २०१६ रोजी सकाळी १०.३० पासून ते शुक्रवार, दिनांक १५ जुलै, २०१६ रोजी सायंकाळी ६.०० पर्यंत** असा राहणार आहे.

ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याची लिंक खालीलप्रमाणे ––

**(unipune.ac.in – Home page – BCUD online – Login – For College Users – College Login & Password – QIP)**

कार्यशाळा/परिषदा यासाठी ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावाची हार्ड कॉपी सोबत जोडलेल्या मार्गदर्शक तत्वांमध्ये (मार्गदर्शकतत्वांमध्ये वेळोवेळी करण्यात येणारे बदल सर्व संबंधित महाविद्यालये/संस्थांना बंधनकारक राहतील) नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती कागदपत्रे जोडून सदर प्रस्तावाची एक प्रत **दिनांक १७ जून, २०१६ पासून दिनांक २० जुलै, २०१६ पर्यंत** कार्यालयीन वेळेत नियोजन व विकास विभागामध्ये जमा करण्यात यावी.

संबंधित महाविद्यालये/संस्थांनी ऑनलाईन प्रस्तावांची हार्ड कॉपी अंतिम तारखेपर्यंत नियोजन व विकास विभागामध्ये जमा न केल्यास, तसेच ऑनलाईन व्यतिरिक्त सादर केलेल्या कोणत्याही प्रस्तावांचा अर्थसहाय्यासाठी विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे.

उपकुलसचिव
नियोजन व विकास

सोबत : मार्गदर्शकतत्वे (बिगर आदिवासी महाविद्यालये व आदिवासी विभागातील महाविद्यालये/संस्था)

टिप : गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत शैक्षणिक उपकरणे, खेळाचे साहित्य व बांधकाम तसेच आदिवासी विभागांकरिता गरजेवर आधारित उपक्रम इत्यादीसाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव नंतर मागविण्यात येणार आहेत.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**गुणवत्ता सुधार योजना — बिगर आदिवासी व आदिवासी विभागातील महाविद्यालये/संस्था यांना विविध उपक्रम राबविण्यासाठी देण्यात येणा—या अर्थसहाय्याबाबतची मार्गदर्शकतत्वे २०१६—१७**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नियोजन व विकास विभागामार्फत गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत विविध उपक्रम राबविण्यासाठी बिगर आदिवासी व आदिवासी विभागातील महाविद्यालये/संस्थानी सदर योजनेच्या मार्गदर्शकतत्वानुसार सादर केलेल्या प्रस्तावानुसार अर्थसहाय्य दिले जाते. सदर आर्थिक वर्षात राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदांचे आयोजनासाठी वर्षातून एकदाच ऑन—लाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करता येईल.

कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदा :—

| अ. क्र. | स्तर | कालावधी | कमीत कमी सहभागी व्यक्तींची संख्या | पैकी विद्यापीठ कार्यक्षेत्रा बाहेरील सहभागी व्यक्तींची संख्या | जास्तीत जास्त मंजुर अर्थसहाय्य रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | राज्यस्तरीय | १ दिवस | ३० | १० विद्यापीठ कार्यक्षेत्रा बाहेरील सहभागी व्यक्ती | रु.६०,०००/— |
| २ | राज्यस्तरीय | २ दिवस | ३० | १० विद्यापीठ कार्यक्षेत्रा बाहेरील सहभागी व्यक्ती | रु.१,००,०००/— |
| ३ | राष्ट्रीय | २ दिवस | ३० | १०राज्याबाहेरील सहभागी व्यक्ती | रु.२,००,०००/— |
| ४ | आंतरराष्ट्रीय | २ दिवस | ३० | ५ आंतरराष्ट्रीय (भारताबाहेरील) व्यक्ती | रु.३,००,०००/— |

(टीप:—महाविद्यालय/संस्थेतील विद्यार्थ्यांना कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदा यांमध्ये उपस्थित राहता येईल परंतू सहभागी व्यक्तींच्या यादीमध्ये विद्यार्थ्यांचा समावेश करता येणार नाही. सहभागी विद्यार्थ्यांची यादी स्वतंत्रपणे जोडावी.)

अ) **राज्यस्तरीय कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदा** — नॅक/एन.बी.ए. प्रमाणपत्र असल्यास दोन कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदांच्या आयोजनासाठी प्रस्ताव सादर करता येईल. सदर प्रमाणपत्र नसल्यास एकाच कार्यशाळा/चर्चासत्र/परिषद यासाठी प्रस्ताव सादर करता येईल.

ब) **राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा/चर्चासत्र/परिषद** — एका शैक्षणिक वर्षात एकाच राष्ट्रीय कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदांच्या आयोजनासाठी प्रस्ताव सादर करता येईल, ज्या विषयासाठी प्रस्ताव सादर करायचा आहे त्या विषयाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमास विद्यापीठाची मान्यता असणे आवश्यक आहे. मान्यता असलेल्या विषयावरच कार्यशाळा आयोजित करता येईल.

क) **आंतरराष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा/चर्चासत्र/परिषद** — एका शैक्षणिक वर्षात एकाच आंतरराष्ट्रीय कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदांच्या आयोजनासाठी प्रस्ताव सादर करता येईल. ज्या विषयासाठी प्रस्ताव सादर करावयाचा आहे त्या विद्याशाखेतील संबंधित विषयाच्या पीएच.डी संशोधन केंद्रास विद्यापीठाची मान्यता असणे आवश्यक आहे.

राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळा/परिषदा/चर्चासत्र यांचे आयोजन करण्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या रकमेचा विनियोग खालीलप्रमाणे करण्यात यावा. यामध्ये विद्यापीठाचा हिस्सा ७५% आणि महाविद्यालये/संस्थांचा हिस्सा २५% असा राहील.

अ. साधनव्यक्तींचे मानधन व प्रवासखर्च — ५०%

ब. संशोधन पत्रिका/लेख प्रकाशन — १०%

क. परिषदेसाठी आवश्यक शैक्षणिक साहित्य/छायांकित प्रत, सीडी इ. २०%

ड. आतिथ्य खर्च, किरकोळ व आकस्मिक खर्च — २०%

उपरोक्त नमूद केलेल्या टक्केवारीनुसार अर्थसहाय्याचा विनियोग त्या त्या अर्थशीर्षासाठी करण्यात यावा. अन्य अर्थशीर्षासाठी खर्च करण्यात येवू नये. (उदा. अ—५०%, ब—१०%, क—२०%, ड—२०% यामध्ये त्या—त्या टक्केवारीपेक्षा जास्त खर्च देय होणार नाही किंवा त्या टक्केवारीमधील शिल्लक रक्कम इतरत्र वापरता येणार नाही)

त्याचप्रमाणे सदर कार्यशाळा/परिषदा/चर्चासत्र यासाठी उपस्थित राहणा—या साधनव्यक्तींना देण्यात येणारे मानधन खालीलप्रमाणे देय राहील.

- **राज्यस्तरीय कार्यशाळा/परिषदा/चर्चासत्र** यासाठी उपस्थित राहणा—या साधनव्यक्तीस **प्रत्येकी रु.२०००/—** इतके मानधन देण्यात यावे.
- **राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा/परिषदा/चर्चासत्र** यासाठी उपस्थित राहणा—या साधनव्यक्तीस **प्रत्येकी रु.३०००/—** इतके मानधन देण्यात यावे.
- **आंतरराष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदा** यासाठी उपस्थित राहणा—या भारतातील साधन व्यक्तींना प्रत्येकी रु.३०००/— आणि भारताबाहेरील साधन व्यक्तींना प्रत्येकी रु.५०००/— इतके मानधन देण्यात यावे.

उपरोक्त कार्यशाळा/परिषदा/चर्चासत्र यासाठी उपस्थित राहण्या—या साधनव्यक्तींचा मानधन व प्रवासखर्च विद्यापीठ नियमानुसार देय राहील. तसेच राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदा यासाठी उपस्थित राहणा—या साधन व्यक्तींचे सदर मानधन हे प्रत्येक दिवसासाठी राहील.

राज्यस्तरीय कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदेसाठी स्वत:चे किंवा भाडेतत्वावरील वाहनखर्च देय राहील. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदेसाठी विमान प्रवासखर्च देय राहील.

साधनव्यक्तींने स्वत:च्या वाहनाने प्रवास केला असल्यास, RCTC झेरॉक्स प्रत, टोलची बिले प्रवास भत्त्याच्या फॉर्मला जोडून माहिती भरुन देणे आवश्यक आहे अथवा भाडेतत्वावर गाडीने प्रवास केला असल्यास ट्रॅव्हल एजन्सीचे देयके टोलबिलासहीत जोडणे आवश्यक आहे व या देयकांवर प्राचार्य/संचालक यांची स्वाक्षरी आवश्यक आहे.

इकॉनॉमी क्लास विमानप्रवासाच्या देयकासोबत व्हिसा, पासपोर्ट व बोर्डिंग पास सादर करणे आवश्यक आहे. तसेच निवासस्थानापासून ते विमानतळ ते कार्यस्थळ हा प्रवास टॅक्सीने केला असल्यास, त्याची मूळ देयके जोडणे आवश्यक आहे. तरच टॅक्सी प्रवासाची देयके अदा केली जातील. ट्रेन अथवा बसफेअर प्रवासाची देयके सादर करताना मूळ तिकिटे सादर करणे आवश्यक आहे.

**************

## विशेष प्रोत्साहनपर अर्थसहाय्य

शैक्षणिक वर्ष २०१६—१७ पासून ज्या महाविद्यालये/संस्थांनी १०० व्या महोत्सवी वर्षात पदार्पण केलेले असेल, अशा संबंधित महाविद्यालये/संस्थांना त्याच शैक्षणिक वर्षात विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी विशेष प्रोत्साहनपर रु.१० लाख इतके अर्थसहाय्य (विद्यापीठ हिस्सा ७५ टक्के व महाविद्यालयाचा हिस्सा २५ टक्के) संबंधित महाविद्यालये/संस्थांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार देण्यात येईल.

सदर अर्थसहाय्यासाठी प्रस्ताव सादर करताना खालील अटीं व संबंधित कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१. महाविद्यालय/संस्था सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी कायम संलग्नित असल्याचे विद्यापीठाचे मान्यता पत्र.

२. महाविद्यालय/संस्थेमध्ये कायमस्वरुपी/प्रभारी विद्यापीठ मान्यताप्राप्त प्राचार्य/संचालक असल्याचे मान्यता पत्र.

३. महाविद्यालय/संस्थेची स्थापना ज्या वर्षी झालेली आहे त्या वर्षीचे विद्यापीठ मान्यता पत्र.

४. संबंधित महाविद्यालय/संस्थेवर विद्यापीठ पातळीवर कोणतीही गंभीर स्वरुपाची कारवाई झालेली नसावी किंवा सुरु नसावी.

५. सदर महाविद्यालय/संस्थेने विद्यापीठाचा सर्व प्रकारचा प्रोरेटा, संलग्नीकरण शुल्क, खर्चाचे सर्व हिशेब सादर केलेले असणे आवश्यक आहे.

६. सदर महाविद्यालय/संस्थेने प्रस्तावासोबत नॅक/एनबीए प्रमाणपत्र तसेच A.I.S.H.E. व M.I.S. माहिती भरल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

७. महाविद्यालय/संस्थेच्या महोत्सवी वर्षात वर्षभर राबविण्यात येणा—या शैक्षणिक उपक्रमाची रुपरेषा व खर्चाचे अंदाजपत्रक.

८. सदर योजनेसाठी प्रस्ताव सादर करताना प्रस्तावासोबत महाविद्यालय/संस्थेने विद्यापीठाच्या वार्षिक अहवालासाठी माहिती पाठविलेली असावी.

९. सदर योजनेच्या अंतर्गत मंजुर रकमेचा विनियोग त्याच महोत्सवी वर्षात करणे बंधनकारक राहील.

**********

**ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करण्याची लिंक खालील प्रमाणे**

unipune.ac.in – Home page - BCUD Online – Login – For College Users – College Login & Password – Quality Improvement Programme

ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावाची प्रिंट काढून त्यासोबत मार्गदर्शकतत्वांमध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडून एक हार्ड कॉपी विद्यापीठाच्या नियोजन व विकास विभागाकडे विहित मुदतीत सादर करावी.

**********